International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.466
Volume 4, Issue 1, Mar-April 2024 ID: IJCRTA0000120 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

**धनंजय प्रकाश अडेलकर* ; डॉ. प्रवीण ज्ञा. कनकुटे****

**लेखक संलग्नता:**
*संशोधक विद्यार्थी, समाजकार्य महाविद्यालय, जालना, महाराष्ट्र. भारत.
Email: dhananjay.adelkar999@gmail.com
**सहाय्यक प्राध्यापक, समाजकार्य महाविद्यालय, जालना, महाराष्ट्र. भारत.
Email: kankutepravin@gmail.com

**लेख संदर्भ:** अडेलकर, धनंजय प्रकाश., & कनकुटे, प्रवीण ज्ञा. (2024). भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 4(1), pg 33-36. ijcrta.org

**प्रस्तावना :-**

भारतातील शेतकरी पूर्वी पासूनच सर्वच दृष्टीने साधन संपन्न होता. परंतु ब्रिटीशांनी भारतावर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर भारतीय शेतीचे स्वरुप बदलले. भारतातील शेतीचा मालक हा शेतमजूर बनला. याचे कारण म्हणजे शेतक-यांचे अज्ञान व असंघटीतपणा होय. भारतीय शेतीला अर्थव्यवस्थेमध्ये फार महत्त्व आहे. देशातील सुमारे 68 ते 69 टक्के लोकसंख्या शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय करतात. ग्रामीण भागातील शेती हा महत्त्वाचा व्यवसाय मानला जातो. भारतातील 30.44 कोटी हेक्टर जमीन लागवडीखाली असून राष्ट्रीय उत्पन्नापौकी 50 टक्के उत्पन्न हे शेती क्षेत्रातून प्राप्त होते. 1989 च्या जनगणनेनुसार 73.3 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर शहरी भागातील लोकसंख्या 26.7 टक्के आहे. 1947 मध्ये भारत देश स्वतंत्र झाला व 1948 ला सरकारने पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले. त्यानंतरच्या कालखंडापासून देशामध्ये औद्योगिकरणाच्या प्रक्रियेला वेग येऊन औद्योगिक विकास झपाटयाने होत गेला. असे असतांना देखिल भारतातील शेतमजूरांचे प्रमाण कमी झाले नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे वेगाने वाढणारी लोकसंख्या होय.

भारतामध्ये 1951 पासून नियोजनाला सुरुवात होऊन पहिल्या पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी क्षेत्रावर अधिक भर देण्यात आला व शेतमजूरांसाठी अनेक हितकारक योजना राबविण्यात आल्या. असे असतांना देखिल औद्योगिक कामगार व कृषी कामगारांचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसून येते की, कृषी कामगारांपेक्षा औद्योगिक कामगार हा अनेक बाबतीत सुखी समाधानी आहे. शेतक-याचे अज्ञान, असंघटीतपणा व वाढती लोकसंख्या यामुळे सर्वांनाच उद्योगामध्ये रोजगार मिळणे अशक्य झाला व बहुसंख्य लोक शेती क्षेत्राकडे वळाले व शेतमजूरांच्या संख्येत वेगाने वाढ झाली. शेतीमध्ये सुध्दा सर्वच लोकांना रोजगार उपलब्ध न झाल्यामुळे बेकारी व अर्धबेकारीमध्ये वाढ झाली. अदृश्य बेरोजगारी ही शेती क्षेत्रामध्येच

आढळून येणारी बेरोजगारी आहे. यामध्ये काम करतांना सर्वच लोक दिसतात परंतु त्यापासून मिळणारे उत्पादन हे फारच कमी असते म्हणजेच त्यातील काही कामगारांची कपात केली तरी उत्पादनावर काहीही फरक पडत नाही.

**शेतमजूराचा अर्थ :-**

1961 च्या जनगणनेनुसार सन 1961 च्या जनगणना अहवालानुसार भूमिहीन शेतमजूर म्हणजे असे मजूर की जे दुस·याच्या शेतावर काम करतात. त्यांना कामाच्या बदल्यात पौसा आणि वस्तूंच्या स्वरुपात मोबदला दिला जातो. अशा मजूरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.

**राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते**

राष्ट्रीय ग्रामीण श्रम आयोगाच्या अहवालानुसार भूमिहीन शेतमजूर म्हणजे असे शेतमजूर की, जे मुळात अकुशल व असंघटीत असून त्यांच्याकडे जीवन जगण्यासाठी श्रमाच्या व्यतिरिक्त दुसरे काहीच नसते. त्यांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.

**संशोधनाचे उद्दिष्टये :-**

1) शेतमजूरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करुन त्यांच्यातील आर्थिक साक्षरता तपासणे.
2) शेतमजूरांसाठी राबविण्यात येणा·या शासकीय योजनांची माहिती मिळविणे.

**शेतमजूरांसाठी उद्दिष्टये :-**

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजना :-**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून भूमिहीन शेतमजूरांसाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमानी व सबलीकरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शासनाकडून जमीन खरेदी करुन ती भूमिहीन अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटुंबाच्या पती-पत्नीच्या नावे केली जाते. मात्र विधवा व परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत जमीन त्यांच्या नावे केली जाते. या प्रवर्गातील दारिद्रयरेषेखालील भूमिहीन शेतमजूर कुटुंबाला चार एकर कोरडवाहू जमीन किंवा दोन एकर बागायती जमीन उपलब्ध करुन देण्यात येते. जमीन खरेदीसाठी येणा·या खर्चापौकी 50 टक्के रक्कम बिनव्याजी कर्ज व 50 टक्के रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येते.

**साहित्य आढवा :-**

अहवालात एस. यांनी "ग्रीन रिव्हेल्यूलेशन ॲण्ड ॲग्रीकल्चर लेबरर्स" या पुस्तकामध्ये भारतातील हरितक्रांती आणि शेतमजूर यावर अभ्यास केला आहे. हरित क्रांतीमुळे भारतातील काही भागांचा काही प्रमाणात आर्थिक विकास झाला आहे. तसेच भारतातील ग्रामीण भागातील काही प्रमाणात दारिद्रयात हरित क्रांतीमुळे दूर झाले आहे. परंतु भारतातील भूमिहीन शेतमजूरांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक दारिद्रयाची जाणीव करुन दिल्याशिवाय कोणत्याही योजनेने किंवा उपायांनी त्यांचे दारिद्रय कमी होऊ शकत नाही असे

मत लेखकांनी मांडले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, भारतामध्ये हरितक्रांती झाली आहे, परंतु ती एका विशिष्ट भागापुरतीच मर्यादित आहे. तसेच हरित क्रांतीमुळे कृषी क्षेत्रातील भूमिहीन शेतमजूरांचा विकास झाला नाही.

देशपांडे स.ह. यांनी योजना मासिकामध्ये "नवी शेती तंत्र आणि शेतमजूर" या शिर्षकाखाली लेख लिहिला. या लेखामध्ये त्यांनी शेतीमध्ये नवे तंत्र आल्यामुळे शेतमजूरांच्या रोजगारावर, मजूरीदरावर परिणाम होतो किंवा नाही याचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, नवीन तंत्राचे स्वरुप हे शेती क्षेत्रामध्ये जास्त रोजगार उपलब्ध करुन देणारे आहे. नव्या बियानांना जास्त खते लागतात व जास्त पाणी पुरवठा लागतो त्याचबरोबर रोगनाशक औषधाचा वापरही अधिक करावा लागतो. पाणी, खते देणे, फवारणे, पावडर मारणे यासाठी अधिक श्रमशक्ती लागणार त्यामुळे शेती क्षेत्रातील रोजगारामध्ये वाढ होईल हे स्पष्ट आहे. तसेच नवीन तंत्रामुळे उत्पादन अधिक आल्याने कापणी, मळणी, वाहतूक, साठवणी या सर्वांमध्ये अधिक श्रमशक्ती गुंतणार हे स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे बियाणांच्या नवीन जाती कमी कालावधीमध्ये काढणीला येत असल्यामुळे एका ऐवजी दोन, तीन पिके घेणे शक्य आहे व असे होत असेल तर रोजगारामध्ये वाढ होणे निश्चित असल्याचे लेखकांनी स्पष्ट केले आहे.

**शेतमजूरांच्या समस्या:**

**शेतमजूरांचे उत्पन्न** - भारतीय शेतकरी हा मुळातच आर्थिक दृष्टया मागासलेला असल्यामुळे शेतक·यांचे उत्पन्न हे फारच कमी असते. त्यामुळे त्याच्या शेतामध्ये जे कामगार किंवा शेतमजूर काम करतात तो त्यांना सुध्दा कमी मजूरी देतो. तसेच त्यांना वर्षातून 5 ते 7 महिने अशा हंगामी स्वरुपात कामे मिळतात. ग्रामीण भागामध्ये शेतीमध्ये पुरुषाला एका दिवसाची मजूरी ही 80 रु. ते 90 रु असून स्त्रिला 60 रु. ते 70 रु. मजूरी मिळते. तसेच शेतीक्षेत्र असंघटीत असल्यामुळे ग्रामीण भागातील मुले शेतामध्ये बाल कामगार म्हणून कामे करतात. त्यांना एका दिवसाची मजूरी ही 30 रु. ते 40 रु. मिळते.

**कामाचा वेग** - शेतीक्षेत्र हे असंघटीत असल्यामुळे त्यामध्ये काम करणा·या कामगारांची कोणतीही संघटना नसते. शेतमजूर सकाळीच कामाला जातो तर संध्याकाळी परत येतो. यामध्ये कामाचे 11 ते 12 तास होतात. इतके राबून सुद्धा त्याला अत्यंत कमी मजूरी मिळते.

**मजूरीचे स्वरुप** - शेतमजूरांना त्यांच्या कामाचा मोबदला कमी तर असतोच परंतु तो त्यांना कधी पौशाच्या स्वरुपात नसून वस्तूच्या रुपाने दिल्या जातो. काही कामगारांना मजूरी ही धान्याच्या स्वरुपामध्ये मिळते तर काही मजूर मालकाकडेच राहतात, तेथेच त्यांना जेवण मिळते व ते वर्षभर काम करतात.

**निष्कर्ष :**

शेतमजूरांच्या आर्थिक व सामाजिक अभ्यासावरुन असे लक्षात येते की, भारतीय शेतकरी व शेतमजूर हा आर्थिकदृष्टया खालावलेला आहे. त्यांना मजुरी कमी मिळत असल्यामुळे त्यांच्या मुलभूत गरजा देखील पूर्ण होत नाहीत. त्यांना सतत सावकाराकडून पौसे व्याजाने घ्यावे लागतात. तसेच एका व्यक्तीच्या उत्पन्नावर

कुटुंबाच्या गरजा पूर्ण नसल्यामुळे शेतमजूर आपल्या मुलांना देखील कामाला नेतो. त्यांच्या जवळ पुरेसा पौसा नसल्यामुळे त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळत नाही.

**संदर्भसूची :**

1) साळुंखे दत्ताजीराव, पवार जगन्नाथराव, 'महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था', महाराष्ट्र विद्यापीठ कॉन्टीनेन्टल प्रकाशन, 1989, पुणे.

2) कविमंडन विजय, 'कृषी अर्थशास्त्र', श्री. मंगेश प्रकाशन, 1989.

3) आचार्य अनुराधा, 'स्वातंत्र्योत्तर काळातील शेतमजूर' योजना मासिक, अंक 12 वा, 26 जाने. 1975, योजना कार्यालय, मुंबई.

4) देशपांडे स.ह., 'नवी शेती तंत्र आणि शेतमजूर', योजना मासिक, अंक 12 वा, 26 जाने. 1975, योजना कार्यालय, मुंबई.

5) मेघे ज्ञानेश्वर, 'कृषी समस्या आणि विकास', पडगीलवार प्रकशन, 1976, नागपूर.

6) घाटोळे रा.ना. 'समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पद्धती', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, 2000.

7) फडणवीस मृणलिनी, देशपांडे प्राची, 'श्रम अर्थशास्त्र', पिंपळापुरे ॲन्ड कं. नागपूर, 2002

8) सोळूंके आर.एस. 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था' कौमास पब्लीकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद, तृतीयावृत्ती, 2003

9) कुलकर्णी बी.डी., ढमढरे एस.व्ही., अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती', डायमंड पब्लिकेशन्स, नागपूर, 2007.